Asst / STI Main Exam. 2009
Paper - I

A

CODE : TNS

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO. 105641

प्रश्नपुस्तिका
मराठी व इंग्रजी

वेळ : 2 (दोन) तास

एकूण प्रश्न : 200
एकूण गुण : 200

सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 200 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

परीक्षा-क्रमांक
केंद्राची संकेताक्षरे
शेवटचा अंक

(2) आपला परीक्षा क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी, **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण ***एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.*** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील''.**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

ताकीद

ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

1. संधी करा - पुन:+जन्म

(1) पुन्हाजन्म (2) पुनर्जन्म (3) पुर्नजन्म (4) पुर्णजन्म

2. पर्यायी उत्तरातून विकल्पबोधक उभयान्वयी अव्ययाचे वाक्य शोधा :

(1) दूरदर्शन शाप की वरदान?

(2) अर्जुन आणि कृष्णाचे आगमन झाले.

(3) मुसळधार पाऊस होता म्हणून तो शाळेत आला नाही.

(4) मी तुझ्याबरोबर येईन पण जेवण घेणार नाही.

3. पुढीलपैकी 'अरबी' भाषेतील शब्द ओळखा :

(1) बटाटा (2) हापूस (3) घमेले (4) अर्ज

4. 'बायकांची अक्कल', 'पायाची दासी' हे वाक्प्रयोग पुरुषांच्या मनातील स्त्रीविषयी कोणती भावना व्यक्त करतात?

(1) अज्ञान (2) श्रेष्ठत्व (3) तुच्छता (4) समता

5. 'आईवडिलांनी मुलांना मायेने वाढविले' या वाक्यातील प्रयोग कोणता?

(1) कर्तरी प्रयोग (2) भावे प्रयोग (3) कर्मणी प्रयोग (4) संकरित प्रयोग

6. पुढीलपैकी कोणते वाक्य शक्य क्रियापदात बसत नाही ते शोधा?

(1) मला काम करवते (2) आजोबांना थोडे बसवते

(3) सासू सुनेला फसवते (4) त्याला मैलभर चालवते

7. व्याख्या पूर्ण करा.

संयुक्त वाक्य म्हणजे _____ .

(1) ज्या वाक्यात केवल आणि केवल, केवल आणि मिश्र वाक्यांचा संयोग असतो असे वाक्य.

(2) ज्या वाक्यात एकच उद्देश व एकच विधेय असते असे वाक्य.

(3) ज्या वाक्यात एक प्रधान वाक्य व एक किंवा अनेक गौण वाक्ये असतात असे वाक्य.

(4) एक किंवा दोन वाक्यांचा अर्थ कायम ठेवून रचना बदललेले वाक्य.

8. पुढीलपैकी कोणता शब्द 'फूल' या अर्थाचा नाही?

(1) कुसुम (2) सुमन (3) पुष्प (4) पाकळी

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

9. वेगळा शब्द ओळखा :
(1) ग्रंथ (2) पोथी (3) पुस्तक (4) पिशवी

10. खालील शब्दाचा नेमका अर्थ कोणता ?
— दुरापास्त
(1) दूर गेलेला (2) दूरचा आप्त (3) अतिशय कठीण (4) अतिशय सोपे

11. खालील शब्दापैकी विसंगत शब्द कोणता ?
(1) वाट (2) पंथ (3) रस्ता (4) पथ

12. खालील वाक्यातील घटनेला समर्पक म्हण सांगा :
'रमा-राघव अतिशय स्वार्थी स्वभावाचे. त्यांची मुलेही त्यांना साजेशीच निपजली.'
(1) अंगापेक्षा बोंगा मोठा (2) खाण तशी माती
(3) पळसाला पाने तीन (4) दिव्याखाली अंधार

13. मुख्य व गौण वाक्यांचे परस्पर रूपांतर करा.
जेव्हा शाळेची घंटा झाली तेव्हा मी वर्गात जाऊन पोहचलो होतो.
(1) केव्हाही घंटा होण्याआधी शाळेत जावे.
(2) शाळेत जातांना वेळेचे बंधन पाळावे.
(3) शाळा नेहमी वेळेचे पालन करीत असते.
(4) जेव्हा मी वर्गात जाऊन पोहचलो तेव्हा शाळेची घंटा व्हायची होती.

14. 'समाजात वावरणारे असले साप ठेचून काढले पाहिजेत.' 'साप' या शब्दातून कोणता अर्थ व्यक्त होतो ?
(1) वाच्यार्थ (2) व्यंग्यार्थ (3) लक्ष्यार्थ (4) लक्षणा

15. प्रयोगाचे रूपांतर करा.
— मांजर उंदीर पकडते (कर्तरी)
(1) उंदीर मांजराकडून पकडला जातो. (2) मांजराने उंदराला पकडले होते.
(3) उंदराला फक्त मांजरच पकडते. (4) मांजराला पकडणे उंदराकडून होते.

16. खालील शब्दसमूहासाठी नेमका शब्द सूचवा.
— संध्याकाळी भोजनोत्तर सहज परिसरात फिरणे.
(1) फेरफटका (2) वामकुक्षी (3) प्रदक्षिणा (4) शतपावली

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

17. संयुक्त वाक्य बनवा :

— 'बस बंद पडली. मला उशीर झाला'

(1) बस बंद पडली म्हणून मला उशीर झाला.

(2) जर बस बंद पडली तर उशीर होणारच.

(3) बस बंद पडली की उशीर होतो.

(4) मला उशीर झाला तेव्हा बस बंद पडली.

18. खालील वाक्यसमुहाचे एक वाक्य तयार करा.

'तू मठ्ठ आहेस का? भरपूर लेखन वाचन कर'

(1) तू मठ्ठ आहेस. भरपूर लेखन व वाचन कर.

(2) तू मठ्ठ आहेस म्हणून भरपूर लेखन व वाचन कर.

(3) तू मठ्ठ असशील तर भरपूर लेखन आणि वाचन कर.

(4) तू मठ्ठ असल्यामुळे भरपूर लेखन, वाचन कर.

19. खालील वाक्यातील गाळलेल्या जागी योग्य शब्द भरा.

एखाद्या परिच्छेदात कशाबद्दल वा कोणाबद्दल सांगितले आहे ; या प्रश्नाचे उत्तर म्हणजे परिच्छेदाचा _____ होय.

(1) आशय (2) विषय (3) मुद्दा (4) हेतू

20. 'देव' या शब्दाचे अनेक वचन पुढीलपैकी कोणते?

(1) देवा (2) देव्या (3) देवे (4) देव

21. पुढीलपैकी 'अभ्यस्त शब्द' ओळखा :

(1) फिरकी (2) गिरकी (3) सार (4) हळूहळू

22. खालीलपैकी कोणता शब्द देशी शब्द नव्हे?

(1) दगड (2) धोंडा (3) पाषाण (4) झाड

23. खालीलपैकी कोणत्या विधानात 'नावडतीचे मीठ अळणी' या म्हणीचा अर्थ सापडतो?

(1) नावडती माणसे शुद्ध मनाची असतात (2) क्षुल्लक कारणांवरुन दुसऱ्यास दोष देणे

(3) अप्रिय व्यक्तीची कोणतीच गोष्ट पटत नाही (4) मीठ कमी खाणारे अप्रिय ठरतात

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

24. 'दिग्दर्शक' या शब्दाचे स्त्रीलिंगी रुप कोणते ?

(1) दिग्दर्शकी (2) दिग्दर्शिका (3) दिग्दर्शीकी (4) दिग्दिर्शक

25. संदर्भानुरुप अर्थ ओळखा.

— 'नाकी नऊ येणे'

(1) घरातील पसारा आवरतांना सदूच्या आईच्या —— आले.

(2) घरातील सुंदर चित्रे पाहून पाहुणे —— आले.

(3) परीक्षेत पहिला क्रमांक आला हे कळताच सुभाषला —— आले.

(4) काम लवकरच संपल्यामुळे सर्व मुले —— आले.

26. लोक आपली स्तुती करोत. लोक आपली निंदा करोत.

— संयुक्त वाक्य करा.

(1) लोक आपली स्तुती करोत म्हणून लोक आपली निंदा करोत.

(2) लोकांनी आमची स्तुती करावी आणि निंदा करावी.

(3) लोक आमची स्तुती करोत किंवा निंदा करोत.

(4) लोक आमची स्तुती-निंदा करोत.

27. अनुभव नसलेला म्हणजे :

(1) अभावित (2) अनुभाव (3) अननुभवी (4) अननुभाव

28. 'पक्षी झाडावर बसतो' या वाक्यातील शब्दयोगी अव्यय ओळखा :

(1) पक्षी (2) झाड (3) वर (4) बसतो

29. खालीलपैकी कोणते वाक्य 'मिश्रवाक्य' आहे ?

(1) तानाजी लढता लढता पडला. (2) तानाजी लढताना पडला.

(3) तानाजी लढत होता आणि तो पडला. (4) तानाजी जेव्हा लढत होता तेव्हा तो पडला.

30. 'आधुनिक' या मराठी शब्दासाठी इंग्रजी प्रतिशब्द कोणता ?

(1) NEW (2) NEWLY (3) MODERN (4) LATEST

31. सर्वनाम म्हणजे _____ .

(1) नामाचे गुणविशेष सांगणारा शब्द (2) सृष्टीतील व्यक्ती, वस्तू इत्यादिचा बोध करून देणारा शब्द

(3) नामाऐवजी येणारा शब्द (4) कोणतीही क्रिया वा कृती दर्शविणारा विकारी शब्द

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

32. पुढीलपैकी कोणता शब्द 'पोर्तुगीज' आहे?
(1) कोबी (2) इस्पितळ (3) तबीयत (4) पॉकेट

33. 'जर-तर, कारण, की' ही उभयान्वयी अव्यये जोडून कोणते वाक्य तयार होते?
(1) मिश्र (2) संयुक्त (3) साधे (4) प्रश्नार्थी

34. खालील वाक्यातील क्रियापद कोणते ते ओळखा?
— तू कोणत्यातरी एकाच देवाला भज.
(1) तू (2) एकाच (3) भज (4) कोणत्यातरी

35. विभक्ती म्हणजे _____ :
(1) विभाग करणे (2) फोड करणे (3) संधी करणे (4) सोडवणे

36. खालील व्यंजन मराठी व्याकरणात मानल्या गेलेल्या गटवारीतील कोणत्या गटातील आहे?
— 'ध्'
(1) 'क्' गट (2) 'च' गट (3) 'त' गट (4) 'प' गट

37. 'तुला जे समजत नाही ते तू शिक्षकांस विचारावे'
वाक्य प्रकार ओळखा :
(1) मिश्रवाक्य (2) संयुक्त वाक्य
(3) केवल वाक्य (4) यापैकी कोणतेही नाही

38. योग्य पर्याय निवडून खालील म्हण पूर्ण करा :
'चोराच्या मनात _____'
(1) पोलीस (2) इन्स्पेक्टर (3) अप्सरा (4) चांदणे

39. खालीलपैकी कोणते वाक्य भूतकाळातील आहे?
(1) मी जेवण करीन (2) मी जेवतो आहे (3) मी जेवण केले (4) मी दररोज जेवतो

40. पुढील वाक्यखंडासाठी एक शब्द सुचवा.
दररोज प्रसिद्ध होणारे वर्तमानपत्र.
(1) पाक्षिक (2) दैनिक (3) साप्ताहिक (4) अनियतकालिक

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

41. खालील शब्दाच्या विरुद्धार्थी असलेला शब्द कोणता?
— ताबडतोब
(1) लगेच (2) हंगामी (3) सावकाश (4) लगबगीने

42. 'तू अतिशहाणा आहेस' या वाक्यातील ध्वन्यार्थ ओळखा.
(1) तू खूप हुषार आहेस. (2) तुला सगळे समजते.
(3) तू मुर्ख आहेस. (4) तू शहाणा आहेस.

43. 'आता त्याने हट्ट सोडावा' या वाक्याचा प्रकार सांगा.
(1) प्रश्नार्थक (2) विध्यर्थी (3) उद्गारार्थी (4) नकारार्थी

44. खालीलपैकी कोणता शब्द क्रियापद आहे?
(1) पुस्तक (2) सुंदर (3) पोसणे (4) लवकर

45. खालील शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?
— वारुणी.
(1) वायुरूपी (2) तट्टाणी (3) मद्य (4) तरूणी

46. देवनागरी लिपी आदर्श लिपी मानण्याचे कारण सांगा.
(1) देवनागरी लिपीत वर्णाला स्वतंत्र चिन्हाने दाखविता येत नाही.
(2) देवनागरी लिपीत उच्चारण्यात येणारा प्रत्येक ध्वनी स्वतंत्र चिन्हाने दाखविता येतो.
(3) देवनागरी लिपीत ध्वनीला स्वतंत्र चिन्ह नसते.
(4) देवनागरी लिपीत एका वर्णाला दोन ध्वनी असतात.

47. 'आमचे शरीर सुदृढ व्हावे. आम्ही योगासने करतो'....
या दोन वाक्यांना कोणत्या उभयान्वयी अव्ययाने जोडले तर ते मिश्र वाक्य तयार होईल?
(1) परंतु (2) म्हणून (3) अथवा (4) व

48. खालीलपैकी कोणता व्यंजनगट 'ओष्ठ्य' वर्गात येतो?
(1) त्, थ्, द्, ध्. (2) क्, ख्, ग्, घ्. (3) ट्, ठ्, ढ्, ण्. (4) प्, फ्, ब्, भ्.

49. 'परवानगीशिवाय आत येऊ नये' वाक्यप्रकार ओळखा :
(1) आज्ञार्थी (2) विध्यर्थी (3) स्वार्थी (4) संकेतार्थी

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

50. खालील वाक्यातील म्हणीच्या योग्य अर्थासाठी समर्पक वाक्य निवडा.

'पोलिसांनी रघूला चोरीच्या आरोपाखाली अटक केली. पण कर नाही त्याला डर कशाला असे म्हणून तो शांत होता'.

(1) तो गुन्हेगार होता. (2) तो अपराधी नव्हता.

(3) तो बेईमान होता. (4) त्याला अपराधी वाटत होते.

51. 'ज्याचे वर्णन करता येणे शक्य नाही असे म्हणजे _____ .

(1) अवर्णनीय (2) अशोभनीय (3) अवर्णन (4) अपवर्णन

52. खालीलपैकी कोणत्या विधानातून 'ताडताड' या शब्दाचा अर्थ योग्य प्रकारे व्यक्त होतो?

(1) ताडासारखे उंच वृक्ष तेथे आहेत.

(2) तडातडा या आवाजाने मला जाग आली.

(3) झालेल्या अपमानाने तो तेथून ताडताड निघाला.

(4) सताड दरवाजातून तो आत शिरला.

53. खालील सामासिक शब्दाचा विग्रह ओळखा.

— प्रजैक्य.

(1) प्रजा + एक (2) प्रजा + ऐक्य (3) प्रजा: + ऐक्य (4) प्रज: + ऐक्य

54. 'खांदेपालट करणे' हा वाक्प्रयोग पुढीलपैकी कशाशी संबंधित आहे?

(1) अन्त्ययात्रा (2) डाव (3) घटका (4) दंड

55. समास ओळखा :

'आईवडील'

(1) अव्ययीभाव (2) द्वन्द्व (3) तत्पुरुष (4) द्विगु

56. खालील शब्दबंधातील समास कोणत्या प्रकारचा आहे?

— सत्यासत्य

(1) द्वंद्व (2) तत्पुरुष (3) अव्ययीभाव (4) बहुव्रीही

57. पुढीलपैकी कोणता शब्द फार्सीतून मराठीत आला आहे?

(1) आसू (2) खर्च (3) आंबा (4) परशू

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

58. 'खलबत्ता' हा शब्द पुढीलपैकी कोणत्या भाषेतून मराठीत आला?
(1) गुजराती (2) हिंदी (3) पोर्तुगीज (4) कानडी

59. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा :
— ते गृहस्थ वाचताना <u>नेहमी</u> अडखळतात.
(1) सर्वनाम (2) क्रियापद (3) नाम (4) क्रियाविशेषण

60. 'उचलली जीभ लावली टाळ्याला' या म्हणीचा अर्थ काय?
(1) घशाला खूप कोरड पडणे (2) एक सारखे बोलत राहणे
(3) मनात येईल तसे बोलणे (4) काहीच न बोलता गप्प राहणे

61. योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.
'धातूला काळ व अर्थ दर्शविणारे प्रत्यय लागून एकंदर सात प्रकारची क्रियापदाची जी रूपे होतात' त्यास मराठी व्याकरणात _____ असे म्हणतात.
(1) वचन (2) पुरुष (3) लिंग (4) आख्यात

62. खालील शब्द मराठी भाषेत कोणत्या भाषेतून आला आहे?
— ग्रंथ.
(1) पोर्तुगीज (2) संस्कृत (3) कानडी (4) अरबी

63. पुढीलपैकी कोणता शब्द 'स्त्रीलिंगी' आहे :
(1) सुतार (2) माळी (3) तेली (4) मुलगी

64. 'हवा कोंदट असल्यास मनुष्याच्या प्रकृती बिघडतात' या वाक्यातील विधेय कोणते?
(1) कोंदट हवा (2) मनुष्य (3) प्रकृती (4) बिघडतात

65. खालील वाक्याचा काळ ओळखा.
'देवकी गीत गात आहे'
(1) पूर्ण वर्तमानकाळ (2) पूर्ण भूतकाळ (3) अपूर्ण वर्तमानकाळ (4) अपूर्ण भूतकाळ

66. खालील शब्दाचे सामान्यरूप होताना त्यास कोणता प्रत्यय लागतो?
— कुंकू
(1) 'आ' (2) 'ऊ' (3) 'वा' (4) 'ए'

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

67. खालील वाक्यप्रकार ओळखा.
तुम्ही आता घरी जा.
(1) संकेतार्थी (2) आज्ञार्थी (3) उद्‌गारार्थी (4) होकारार्थी

68. खालील वाक्यप्रकार ओळखा :
'ही काही वाईट कल्पना नाही'
(1) नकारार्थी (2) होकारार्थी (3) संकेतार्थी (4) विधानार्थी

69. 'पती' या शब्दाच्या समानार्थी शब्द पुढील पर्यायातून निवडा :
(1) प्रियकर (2) भ्रतार (3) जिवलग (4) सखा

70. खालीलपैकी पंचमी-विभक्तीचा प्रत्यय लागलेला शब्द कोणता ?
(1) त्याहून (2) त्याला (3) त्यात (4) त्याचा

71. खालीलपैकी समूहवाचक शब्द ओळखा.
— 'पक्ष्यांचा _____'
(1) तांडा (2) थवा (3) कळप (4) समूह

72. खालीलपैकी कोणता शब्द शुद्ध स्वरुपात आहे ?
(1) प्रतीदिन (2) प्रतिदीन (3) प्रतीदीन (4) प्रतिदिन

73. अनेक शब्दांऐवजी एक शब्द योजणे :
— त्या बाईला आता कोणती इच्छा राहिली नाही.
(1) ती बाई निरक्षर आहे. (2) ती बाई नि:स्वार्थी आहे.
(3) ती बाई इच्छाहिन आहे. (4) ती बाई निरिच्छ आहे.

74. पुढील म्हण पूर्ण करा.
खाई त्याला _____ .
(1) रोगराई. (2) पचेल. (3) खवखवे. (4) खाऊच खाऊ.

75. 'मासा' या शब्दाचे अनेक वचनी रूप ओळखा :
(1) मासे (2) माशे
(3) माश्ये (4) यापैकी कोणतेही नाही

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

76. मराठी भाषेचे लेखन कोणत्या लिपीत केले जाते?
(1) नागरी (2) मोडी (3) संस्कृत (4) देवनागरी

77. 'गाय' शब्दाशी संबंधित नसलेला शब्द ओळखा :
(1) धेनू (2) गोमाता (3) गो (4) Go

78. 'अल्पज्ञानाने ताठा मिरविणे' म्हणतात ना _____ .
(1) उथळ पाण्याला खळखळाट फार. (2) नाचता येईना अंगण वाकडे.
(3) उंटावरचा शहाणा. (4) आढे वेढे घेणे.

79. 'पाणी' या शब्दाच्या समानार्थी शब्द शोधा :
(1) जल (2) जलद (3) ढग (4) क्षार

80. 'हाजीर तो वजीर' या म्हणीचा अचूक पर्याय पुढीलपैकी कोणता?
(1) बुद्धिबळाच्या खेळात 'वजीराला' महत्त्व असते.
(2) जो वेळेला हजर असतो त्याचा फायदा होतो.
(3) 'वजीर' छान चित्रपट असतो.
(4) हजेरी बुकात नाव नोंदवणे.

81. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाला लागलेला प्रत्यय कोणत्या विभक्तीचा आहे?
— सर्वजण त्यादिवशी <u>घरात</u> बसून होते.
(1) पंचमी (2) चतुर्थी
(3) तृतीया (4) यापैकी कोणत्याही नाही

82. 'विदुषी' हे खालीलपैकी कोणत्या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप आहे?
(1) विदुषक (2) मुर्ख (3) विद्वान (4) आयुष्यवान

83. '<u>यत्न</u> तो देव जाणावा' अधोरेखित शब्दाचा अर्थ ओळखा :
(1) प्रयत्न (2) श्रम (3) कष्ट (4) झीज

84. 'घरोघरी मातीच्या चुली' या म्हणीचा अर्थ खालील पर्यायातून स्पष्ट करा.
(1) प्रत्येक घरात चूल असतेच. (2) मातीच्या चुली करण्याची पद्धत घरोघरी आहे.
(3) मातीपासून चुली बनतात. (4) सर्वत्र सारखीच परिस्थिती असते.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

85. पुढीलपैकी कोणता शब्द 'बहुव्रीही' समासातील नाही ते शोधा :
(1) अनंत (2) निर्धन (3) नीलकंठ (4) भाजीभाकरी

86. पुढीलपैकी 'प्रत्ययघटित' शब्द कोणता?
(1) दिवाणखाना (2) दुर्जन (3) कटकट (4) चुळबूळ

87. वाक्याचा प्रकार ओळखा.
केवढा अगडबंब माणूस हा!
(1) होकारार्थी (2) आज्ञार्थी (3) नकारार्थी (4) उद्‌गारार्थी

88. 'कडाक्याची थंडी असली तरी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर होईलच' या वाक्याचा प्रकार सांगा.
(1) विधानार्थी (2) आज्ञार्थी (3) संकेतार्थी (4) विध्यर्थी

89. खालीलपैकी कोणत्या शब्दाचे एकापेक्षा अधिक अर्थ संभवतात?
(1) राग (2) पुस्तक (3) चार (4) हात

90. मराठी व्याकरणामध्ये 'खाणाखुणा' हा शब्द कोणत्या प्रकारचा मानला जातो?
(1) सामासिक (2) अभ्यस्त (3) उपसर्गघटीत (4) उपसर्गसाधित

91. 'ज्याच्या अंगात सामर्थ्य तो इतरांवर अंमल गाजवतो' या अर्थाची म्हण :
(1) तळे राखील तो पाणी चाखील. (2) बळी तो कान पिळी.
(3) गर्जेल तो पडेल काय? (4) टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही.

92. खालीलपैकी कोणता शब्द विरुद्धार्थी शब्दाची जोडी नाही?
(1) खरेखोटे (2) सत्यासत्य (3) भोळाभाबडा (4) प्रश्नोत्तर

93. 'वारंवार' हे कोणत्या प्रकारचे क्रिया विशेषण आहे?
(1) स्थलवाचक (2) परिणामवाचक (3) रीतिवाचक (4) कालवाचक

94. 'दुर्लक्ष करणे' या अर्थाचा खालीलपैकी वाक्‌प्रचार कोणता?
(1) कान टोचणे (2) कानाडोळा करणे
(3) कानात तेल घालून झोपणे (4) कानाला खडा लावणे

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

95. 'शंख' हा शब्द योग्य प्रकारे व्यक्त करणारा पर्याय कोणता?

(1) शन्ख (2) शण्ख (3) शङ्ख (4) शम्ख

96. 'दुर्जन माणसाशी संगत केल्यास प्रसंगी जिवालाही धोका निर्माण होतो' या अर्थाची म्हण ओळखा.

(1) अडला हरी गाढवाचे पाय धरी (2) असंगाशी संग आणि प्राणाशी गाठ

(3) इकडे आड तिकडे विहीर (4) उंदराला मांजर साक्ष

97. 'सहकुटुंब' या सामासिक शब्दाचा विग्रह कशा प्रकारे होईल?

(1) सह आणि कुटुंब (2) कुटुंब आणि सह

(3) सही असे कुटुंब (4) कुटुंबासहित असा जो तो

98. पर्यायी उत्तरातून पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप ओळखा.

(1) नदी - नद्यांना (2) डबा - डब्यातील

(3) भिंत - भिंतीच्या (4) कुऱ्हाड - कुऱ्हाडीने

99. खालील शब्दखंडाचा नेमका अर्थ कोणता?

— उंटावरचा शहाणा.

(1) फार उंची गाठलेला माणूस (2) उंचावरुन बोलणारा माणूस

(3) मूर्खपणाचा सल्ला देणारा माणूस (4) शहाणपणाचा सल्ला देणारा माणूस

100. पुढीलपैकी कोणता शब्द 'नपुसकलिंगी' नाही?

(1) पुस्तक (2) चित्र (3) मंगळसूत्र (4) शाळा

101. 'चढ' या क्रियापदास लिंग, वचन, व पुरुष यांच्या झालेल्या विकाराचा गट शोधा :

(1) चढतो, चढतात, चढतोस (2) चढ, चढले, चढतात

(3) चढलो, चढले, चढतात (4) चढते, चढतात, चढले

102. 'खाई त्याला खवखवे' या म्हणीला पर्यायी म्हण सुचवा :

(1) कोल्हा काकडीला राजी (2) चोराच्या मनात चांदणे

(3) बुडत्याचा पाय खोलात (4) यांपैकी कोणतेही नाही

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

103. खालील वाक्याचे नकारार्थी रुप बनवा.

— असली हयगय काय कामाची असते?

(1) असली हयगय कामाची नसते असे नाही.

(2) असली हयगय कामाची नसते.

(3) कामाची हयगय अशी नसते.

(4) असे नाही की हयगय कामाची नसते.

---

104. प्रश्नार्थी वाक्याच्या शेवटी कोणते विरामचिन्ह येते?

(1) प्रश्नचिन्ह (2) उद्‌गारचिन्ह (3) पूर्णविराम (4) स्वल्पविराम

---

105. 'सावकाश' या क्रिया विशेषणाचा प्रकार ओळखा :

(1) स्थलवाचक क्रिया विशेषण (2) रीतिवाचक क्रिया विशेषण

(3) काळवाचक क्रिया विशेषण (4) संख्यादर्शक क्रिया विशेषण

---

106. खालीलपैकी कोणता शब्द 'विशेषण' नाही ते ओळखा?

(1) गोड (2) कडू (3) दहा (4) मी

---

107. खालील शब्दाचा समानार्थी मराठी शब्द कोणता?

— सौदामिनी.

(1) मसाला (2) वीज (3) माळा (4) सुंदर स्त्री

---

108. पुढीलपैकी भावे प्रयोगाचे वाक्य ओळखा :

(1) रामाने रावणास मारले (2) सुरेशने पुस्तके वाचली

(3) प्रभा भरभर चालते (4) ज्ञानदा आंबे खाते

---

109. खालील म्हणीचा नेमका अर्थ कोणता?

कोठे इंद्राचा ऐरावत आणि कोठे शामभटाची तट्टाणी.

(1) सारी माणसे शेवटी सारखीच असतात.

(2) एक अतिशय थोर तर एक अतिशय क्षूद्र.

(3) इंद्र व शामभट यांची वाहने वेगवेगळी आहेत.

(4) प्रत्येक माणसाचा स्वभावधर्म वेगवेगळा असतो.

---

110. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :- 'नावडतीचे मीठ _____'.

(1) पुळणी (2) गुळणी (3) अळणी (4) चुळणी

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्न क्रमांक 111 ते 115 ची उत्तरे द्या :

परमेश्वर आपल्या सगळ्यांना जन्म देतो आणि आपली परीक्षा घेतो. ज्याप्रमाणे शाळेत गणिताचा, भूगोलाचा पेपर असतो त्याप्रमाणे श्रीमंतीचा पेपर, गरिबीचा पेपर इत्यादी पेपर परमेश्वर आपल्याकरिता काढीत असतो. समजा देवाने एखाद्याला श्रीमंती, वैभव दिले आहे आणि त्याने पैशाचा उपयोग भुकेल्यांना खायला घालण्यात, भूमिहीनांना भूमी देण्यात, गरिबांना मदत करण्यात केला तर तो श्रीमंतीच्या पेपरात पास झाला. पण समजा त्याने पैशाचा उपयोग लोकांना लुटण्यात, गरिबांना त्रास देण्यात केला तर तो श्रीमंतीच्या पेपरात नापास झाला. जगाकडे पाहण्याची माझी ही दृष्टी आहे. देवाने मला शक्ती, अशक्तता, बुद्धी, मूर्खपणा, श्रीमंती, दारिद्र्य इत्यादी जी काही देणगी दिली आहे ती माझी परीक्षा पाहण्याकरिता दिली आहे हे ओळखून मी वागेन तर देवाचा लाडका होईन. माझ्या हातून जगाची सेवा होऊ शकेल. नाहीतर मी भोगविलासात मग्न राहीन व दु:खी होईन. मग मरताना रडेन. तुम्ही जन्माला येता तेव्हा रडत रडत जन्माला येता. परंतु लोक मुलगा झाला म्हणून आनंदाने हसतात. पण तुम्ही जीवनात परोपकाराची, सेवेची कामे करा की तुम्ही हसत मराल व लोक रडतील व मनुष्यजन्म देऊन देवाने तुमची जी परीक्षा घेतली त्यात तुम्ही पास व्हाल.

111. सेवेची कामे केली, की, काय होईल?

(1) मनुष्यजन्म वाया जाईल (2) तुम्ही हसत मराल

(3) भोगविलासात मग्न राहाल (4) तुम्ही दु:खी व्हाल

---

112. माझ्या हातून कुणाची सेवा होऊ शकेल?

(1) जगाची (2) राजाची (3) सेवकाची (4) राणीची

---

113. श्रीमंतीच्या पेपरात पास कसे होता येते?

(1) लोकांना लुटून (2) गरिबांना त्रास देऊन

(3) गरिबांना मदत करुन (4) गरिबांचे शोषण करुन

---

114. परमेश्वर आपली परीक्षा घेताना कोणते पेपर घेतो?

(1) गरिबी श्रीमंतीचा पेपर (2) गणिताचा पेपर

(3) भूगोलाचा पेपर (4) इतिहासाचा पेपर

---

115. कोणते शीर्षक उताऱ्यास समर्पक ठरेल?

(1) परमेश्वर आणि परीक्षा (2) पास आणि नापास

(3) मुलगा आणि मुलगी (4) हसणे आणि रडणे

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्न क्रमांक 116 - 120 ची उत्तरे लिहा :

माणसांचा बाजार भरला म्हणजे विक्रीला योग्य तो माल तयार केला जातो. पुरुष अपल्या मालकाला हवे असतील तसे परिश्रम करायला शिकतो. आणि स्त्री पुरुषाला आवडेल तसे शरीर नटविते. ईश्वराने दिलेल्या अवयवांना छिद्रे पाडून शरीराच्या सौंदर्यात भर घालते. ज्याला सौंदर्य पाहायची दृष्टी असेल त्याला माणसाचे नुसते शरीर सुंदर दिसेल. एखाद्याचे शरीर किंवा एखाद्याचे श्रम विकत घ्यावे ही गोष्टच त्याला खपणार नाही. सुवर्णयुगापेक्षाही मानव्याचे युग श्रेष्ठ आहे. सत्तेच्या युगापेक्षा सत्ययुग अधिक मंगलकारक आहे. सत्ययुगात माणसाची सत्ता चालणार नाही. माणूस माणसाला विकला जाणार नाही. त्याला कुणी वर्गहीन समाज म्हणोत, आम्ही त्याला मानवाचे स्वराज्य म्हणतो. असे मानवाचे युग आणायला शस्त्रवाद, प्रभुत्ववाद व यंत्रवाद या तिन्ही वादांचा नायनाट झाला पाहिजे. याचा अर्थ असा नाही की, यंत्र किंवा उपकरणे मुळीच नकोत. त्यांचा उपयोग असा झाला पाहिजे की, त्यांच्या योगाने मानवाच्या सर्व नैसर्गिक शक्तींचा व्यवस्थित विकास होईल, इतकेच म्हणायचे आहे.

116. या उताऱ्यास समर्पक शीर्षक सूचवा.

(1) मानव्यांचे युग (2) नटवी स्त्री (3) यंत्रवाद (4) प्रभुत्ववाद

---

117. लेखकाच्या मते सर्वश्रेष्ठ युग कोणते ?

(1) सत्ययुग (2) सुवर्णयुग (3) मानव्ययुग (4) सत्तायुग

---

118. बाजाराचे वैशिष्ट्य काय असते ?

(1) माणसांची खूप गर्दी असते. (2) विक्रीसाठी खूप माल असतो.

(3) बाजरात खूप यंत्रे-उपकरणे असतात (4) विक्री योग्य माल तयार केला जातो.

---

119. पुरुषाला आपण आवडावे, म्हणून स्त्री काय करते ?

(1) खूप परिश्रम करते (2) भरपूर विक्री होईल असा माल तयार करते

(3) सुवर्णाची मागणी करते (4) आपले शरीर नटवते

---

120. मानवाच्या नैसर्गिक शक्तीचा विकास केव्हा होईल ?

(1) शस्त्रवाद, प्रभुत्ववाद व यंत्रवादाचा नायनाट झाल्यावर.

(2) यंत्र व उपकरणे यांचा योग्य प्रकारे वापर झाल्यावर.

(3) वर्गहीन समाज निर्माण झाल्यावर.

(4) यंत्र व उपकरणे हद्दपार केल्यावर.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

खालील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्न क्रमांक 121 ते 125 ची उत्तरे लिहा :

भारतीय संस्कृतीत समाजाला महत्त्व आहे की व्यक्तीला? समाजासाठी व्यक्ती आहे. व्यक्ती म्हणजे माया आहे, समाज सत्य आहे. अद्वैत सत्य आणि द्वैत मिथ्या आहे. श्री शंकराचार्य संसाराला मिथ्या मानतात याचा अर्थ काय? व्यक्तीचा संसार मिथ्या आहे. माझ्या आजूबाजूला दु:ख असताना मी एकटा सुखी होऊ पाहाणे म्हणजे भ्रम आहे. आजूबाजूला आग लागली असता माझे एकट्याचे घर सुरक्षित कसे राहील? जगात केवळ स्वत:साठी पाहाता येणार नाही. कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती जर केवळ स्वत:पुरते पाहील तर कुटुंबाचा नाश होईल, त्या कुटुंबात आनंद कसा दिसेल? समाधान कसे नांदेल? ज्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती इतरांच्या सुखात स्वत:चे सुख मानते, तेच कुटुंब भरभराटेल, सुखी व आनंदी दिसेल. जो नियम कुटुंबाला लागू तोच समाजाला, सर्व संसाराला. आपण समाजासाठी आहोत, मानवजातीसाठी आहोत, सर्व प्राणिमात्रांसाठी आहोत. दगड अलग पडला तर त्याला महत्त्व नाही, परंतु तो इमारतीत संयमपूर्वक बसेल, तर त्याला अमरता येते, त्याला महत्त्व येते आपण या समाजाच्या सुंदर इमारतीत योग्य ठिकाणी बसले पाहिजे व तेथे शोभले पाहिजे.

121. वरील उताऱ्याचा मुख्य विषय आहे :

(1) परोपकार (2) कौटुंबिक आनंद

(3) व्यक्ती व समाज (4) कौटुंबिक जबाबदारी

---

122. व्यक्ती आणि समाज यांचे नाते कशासारखे आहे?

(1) अद्वैत – द्वैत (2) दगड – इमारत (3) सत्य – मिथ्या (4) प्रपंच – कुटुंब

---

123. 'अद्वैत' म्हणजे :

(1) आनंद (2) एकत्व (3) परमार्थ (4) वैरभाव

---

124. कोणती गोष्ट कुटुंबाच्या नाशास कारणीभूत ठरेल?

(1) अद्वैतवादी जाणीव (2) प्रपंच

(3) सुखोपभोग (4) संकुचित स्वार्थ

---

125. सुखी कुटुंबाचे रहस्य :

(1) परमार्थसाधना करणे (2) परोपकार करणे

(3) कुटुंबाचे रक्षण करणे (4) इतरांच्या सुखात स्वत:चे सुख मानणे

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्न क्रमांक 126 ते 130 ची उत्तरे द्या :

पुस्तकासारखा मित्र नाही असे म्हणतात. इतर मित्र आहेत; पण ते कधी रागावतात, कधी चिडतात, तर कधी चेष्टा करतात. कधी वेळेच्या अभावी उपयोगी पडत नाहीत. कधी ते आपले अंतरंग खुले करत नाहीत. ते आपणांपासून काहीतरी लपवून ठेवतात. परंतु पुस्तकाचे तसे नाही. त्याला जवळ करण्याचा अवकाश की, ते आपले अंतरंग खुले करते. ते कधी फसवत नाही, कधी चुकवत नाही, नेहमी अगदी आपल्या सेवेस तयार असते.

पुस्तकांचे पुष्कळ प्रकार असतात. काही पुस्तके अल्पायुषी, तर काही दीर्घायुषी असतात. त्यांचे आयुष्य त्यांच्यामधील विचारांवर अवलंबून असते. विचार जितके स्थायी तितकी पुस्तके स्थायी. वर्तमानपत्राचे आयुष्य एक दिवस. सकाळी उत्साहाने व आतुरतेने ते आपण वाचतो, पण त्याचे पारायण करतो असे कोणी म्हणेल तर योग्य होणार नाही. मासिकांचे आयुष्य एक महिना. परंतु काही पुस्तके सदासर्वकाळ बहुमोल असून तप्त मनाला समाधान देतात. भगवद्गीता, बायबल, कुराण, वेद वगैरे या प्रतीचे ग्रंथ होत.

126. तप्त मनाला समाधान देणारे ग्रंथ कोणते ?

(1) भगवद्गीता, बायबल, कुराण, वेद (2) रामायण, महाभारत

(3) ज्ञानेश्वरी, अभंगवाणी (4) रामदासांचे दासबोध

127. कोणते शीर्षक उताऱ्याला अधिक समर्पक ठरेल?

(1) बिल्हणचरित्र (2) बायबल

(3) कुराण (4) पुस्तक - माणसाचा खरा मित्र

128. वर्तमानपत्राचे आयुष्य किती दिवस असते?

(1) पाच (2) तीन (3) एक (4) दोन

129. गाळलेल्या जागा भरा :

'काही पुस्तके _____ तर काही _____ असतात.

(1) अल्पायुषी, दीर्घायुषी (2) उत्साही, आतुर

(3) अमोल, बहुमोल (4) स्थायी, अस्थायी

130. पुस्तकाला मित्र, का म्हटले आहे?

(1) पुस्तके खोटे बोलतात (2) पुस्तके मन खुले करतात

(3) पुस्तके मानवाला फसवतात (4) पुस्तकांचे आयुष्य कमी असते

